महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९

Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/मव्य(भूमी)/P125863 दिनांक: 13/08/2024

# परिपत्रक

**विषय: भूखंडाच्या उर्वरीत अधिमुल्याची (Balance of Premium – BOP) रक्कम भरण्याकरिता कालावधी देणेबाबत.**

**संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक डी-०९१५६, दिनांक ०३.११.२०१४.**
**(२) परिपत्रक क्रमांक ए-२४७५०, दिनांक २२.०१.२०१४.**
**(३) परिपत्रक क्रमांक ए-८४१५८, दिनांक १२.०५.२०२३.**

महामंडळाच्या परिपत्रक क्रमांक ए-८४१५८, दिनांक १२.०५.२०२३ अन्वये वाटपपत्रातील १८० दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर अर्जदाराने कोव्हिडमुळे उद्भवलेली परिस्थिती तसेच सद्य:स्थितीतील जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी आणि त्याचा उद्योग जगतावर होत असलेला परिणाम त्याचप्रमाणे उद्योजकांचे स्वत:चे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे दुर्धर आजारपण (महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३, दिनांक १९.०३.२००५ मधील परिशिष्ट - "अ" मध्ये नमूद २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या सुचीमधील आजार), नैसर्गिक आपत्ती, अर्जदाराच्या आवाक्याबाहेरील न टाळता येणारी परिस्थिती (unavoidable circumstances / beyond the control of allottee) इत्यादि कारणांमुळे प्रस्तुतचे परिपत्रक निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांचे आत अर्ज केल्यास अशा प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे प्रस्ताव मंजुर झाल्यापासुन ३० दिवसांचा सशुल्क वाढीव कालावधी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान करत आले आहेत. तथापि, वरीलप्रमाणे महामंडळास अर्ज सादर करण्याचा ९० दिवसांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

बरेच उद्योजक विविध कारणांमुळे विहीत मुदतीत उर्वरित अधिमुल्याच्या रक्कमेचा (BOP) भरणा करु शकले नसल्याने सदर रक्कमेचा भरणा करणेकरिता वाढीव कालावधी मिळणेबाबत मा. मंत्री महोदय यांना प्रत्यक्ष भेटून विनंती करीत असतात. तसेच उपरोक्त परिपत्रकानुसार सदर रक्कमेचा भरणा करणेकरिता वाढवून दिलेल्या कालावधीसंदर्भात खूप कमी उद्योजकांना अवगत झालेले असल्याने बहुतांश उद्योजक

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

सदर योजनेचा फायदा घेऊ शकलेले नाहीत. त्याअनुषंगाने महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक २९.०७.२०२४ रोजी झालेल्या ४०० व्या बैठकीमध्ये पारीत ठराव क्रमांक ६८०० अन्वये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

वाटपपत्रातील १८० दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर अर्जदाराने कोव्हिडनंतर उद्भवलेली परिस्थिती तसेच सद्य:स्थितीतील जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी आणि त्याचा उद्योग जगतावर होत असलेला परिणाम त्याचप्रमाणे उद्योजकांचे स्वत:चे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे दुर्धर आजारपण (महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३, दिनांक १९.०३.२००५ मधील परिशिष्ट - "अ" मध्ये नमूद २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या सुचीमधील आजार), नैसर्गिक आपत्ती, अर्जदाराच्या आवाक्याबाहेरील न टाळता येणारी परिस्थिती (unavoidable circumstances / beyond the control of allottee) इत्यादि कारणांमुळे प्रस्तुतचे परिपत्रक निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांचे आत अर्ज केल्यास अशा प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे प्रस्ताव मंजुर झाल्यापासुन महामंडळाच्या नियमानुसार व्याजासह उर्वरीत अधिमुल्याची रक्कम भरणेकरिता ३० दिवसांचा वाढीव कालावधी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) १२-०८-२४

(अनिल भंडारी, भाप्रसे)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम,अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in